सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/००८ अत्यंत महत्त्वाचे दिनांक : १२/०६/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' लागू करणेबाबत....**
**संदर्भ : उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांचे DHEPN-MV11012/269/2024-COLLWG1/ E-Comp. No.: 879848, दि. ०९ जून, २०२५ चे पत्र.**

महोदय/महोदया,

शासन निर्णय व संचालनालयाच्या पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्त्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या विमा योजनांचा आढावा घेऊन योजनांची व लाभांची विविधता लक्षात घेता सर्व समावेशक एकछत्री नवीन विमा योजना लागू करण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ व दि. २८.११.२०२३ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility, Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय सोबत जोडले आहेत. तसेच याबाबतचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. शासनाने उपरोक्त संदर्भाकीत पत्रान्वये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी तसेच पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे शासनाने आपल्या पत्रात नमूद केले आहे.

शासन निर्देशानुसार या पत्राद्वारे आपणांस कळविण्यात येते की,

१. स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या संकेतस्थळावर सदरहू योजनेचा तपशिल उपलब्ध करून देण्यात यावा.
२. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई–मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा.
३. 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजने'ची माहिती आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेत, माहितीपत्रक, प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे व आपल्या संकेतस्थळावर प्रवेशासंदर्भातील माहिती समवेत, याचबरोबर प्रवेशाच्या ठिकाणी, मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात. (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करुन सर्व विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करावे.

या संबंधीचे पत्र व शासन निर्णय आपल्या माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सदर स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

शासन निर्देशानुसार सदर स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेसंदर्भात जबाबदारीने व काटेकोरपणे आपल्या स्तरावर वरीलप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९


File No.: DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1/ E-Comp. No.: 879848

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय: राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करणेबाबत.**

**संदर्भ:**
1. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.१६.१०.२०२३
2. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.२८.११.२०२३
3. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/विवि/२०२३/मवि- ०१/१६२४३ दि. ०६.१२.२०२३
4. संचालनालयाचे पत्र क्र. DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1/ E-Comp. No.: 879848दि. १७.१०.२०२४

उपरोक्त विषयी, संदर्भांकीत शासन निर्णय व संचालनालयाच्या पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्त्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या विमा योजनांचा आढावा घेऊन योजनांची व लाभांची विविधता लक्षात घेता सर्व समावेशक एकछत्री नवीन विमा योजना लागू करण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ व दि. २८.११.२०२३ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ' स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility , Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये दिलेल्या आहेत. तसेच याबाबतचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. संचालनालयाचे संदर्भांकीत पत्रान्वये आपल्या कार्यकक्षेतील विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी तसेच पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तथापि सदर योजेनेबाबत विद्यापीठांकडून पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठांना खालीलप्रमाणे पुनश्च: निर्देश देण्यात येत आहेत.

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उक्त निर्देशानुसार स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 09-06-2025 12:51:42

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र शासन

## उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-उशिसं/विवि/२०२४/मवि- ०१/ **E-Comp. No.: 879848**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय- राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करणेबाबत.**

**संदर्भ-** १.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.१६.१०.२०२३
२.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.२८.११.२०२३
३.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/विवि/२०२३/मवि- ०१/१६२४३ दि. ०६.१२.२०२३

उपरोक्त विषयी, संदर्भांकीत शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी ' स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना ' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility , Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ सोबतच्या प्रपत्र - अ मध्ये दिलेल्या आहेत. तसेच याबाबतचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून दिलेला आहे. संचालनालयाचे संदर्भीय पत्र दि. ०६.१२.२०२३ अन्वये आपल्या कार्यकक्षेतील विद्यापीठ व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी कळविण्यात आलेले आहे.

सदर योजेनेबाबत विद्यापीठांकडून पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी या योजनेबाबत केलेल्या कार्यवाहीचा पत्रव्यवहार सादर करावा.
२. सदर योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील किती विद्यार्थ्यांनी ' विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा ' व ' विद्यार्थी वैद्यकीय विमा ' साठी नोंदणी केलेली आहे, याबाबतचा तपशिल सादर करावा.
३. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करावा. संकेतस्थळावर तपशिल उपलब्ध करून दिला नसल्यास, तात्काळ सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

४. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

५. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उक्त निर्देशानुसार स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **दि. २५.१०.२०२४** पर्यंत संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-10-2024 18:14:13

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण )
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

**अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) योजना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - १६ ऑक्टोबर , २०२३

संदर्भ : -१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/ प्र.क्र.१४/विशि५, दिनांक ०२ जून, २०२१.

२)संचालक,उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांची

१) क्र. विवि २१३३/ प्र.क्र.२८/ मवि.०१ /९३४४, दि. २४/०८/२०२३ तसेच

२) क्र. विवि २१३३/ प्र.क्र.२८/ मवि.०१ /१००२२, दि. २७/०९/२०२३ ची पत्रे

**प्रस्तावना :**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ०२ जून, २०२१ अन्वये, राज्यातील अकृषी विद्यापीठे, तंत्र विद्यापीठ व अधिनस्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन स्वरूपात “विद्यार्थी जीवन / अपघात विमा योजना” लागू करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी “विद्यार्थी अपघात विमा” योजना नवीन स्वरुपात लागु करण्यासंदर्भात, IRDAI परवानाधारक एक अनुभवी सल्लागार नेमून, त्यांना या विषयाबाबत सखोल अभ्यास करून अंमलबजावणी करण्यासारख्या बाबी तसेच त्यांच्या कार्यपध्दतीबाबत अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. संचालक उच्च शिक्षण यांनी, निविदा छाननी समितीने तांत्रिक मुल्यमापन करून गुणांकनाच्या आधारे “इन्टिग्रेटेड रिस्क इन्शुरन्स ब्रोकर लिमिटेड” या विमा सल्लागार कंपनीची निवड केली होती.

प्रस्तूत विद्यार्थी अपघात विमा योजना संदर्भात विमा संचालनालय यांचे राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रस्तावित करण्यात आलेली विद्यार्थी अपघात योजना संदर्भात अभिप्राय घेण्यात आले होते.

प्रस्तूत IRDAI परवानाधारक सल्लागार तसेच विमा संचालनालय यांचे सुचनांनुसार अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालये येथे विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा ( Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) अंमलात आणण्यासाठी आयआरडीए परवानाधारक विमा कंपनी निवडण्यासाठी ई-निविदेद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. ई-निविदेमधील तरतूदींनुसार न्युनतम निविदा धारकासोबत दराबाबत वाटाघाटी करुन संचालक, उच्च शिक्षण यांनी सादर केलेल्या दि.२७.०९.२०२३ च्या प्रस्तावानुसार विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** -

अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी “ऐच्छिक स्वरुपाची” विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (**Personal Accident Insurance** ) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (**Medical Insurance** ) खालीलप्रमाणे अंमलात आणणेबाबत सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नाव | **विद्यार्थी वैयक्तिक <u>अपघात विमा</u>** **१ लक्ष साठी** प्राप्त न्युनतम दर (रुपये) | **विद्यार्थी वैयक्तिक <u>अपघात विमा</u>** **५ लक्ष साठी** प्राप्त न्युनतम दर (रुपये) | **विद्यार्थी <u>वैद्यकीय विमा</u>** **रु.२ लक्ष साठी** प्राप्त न्युनतम दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | ICICI Lombard Insurance Company Ltd | **२०** | --- | --- |
| २. | National insurance co. Ltd. | --- | **६२** | --- |
| ३. | ICICI Lombard Insurance Company Ltd | --- | --- | **४२२** |

२. तरी संबंधित विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालये यांचेकडून उपरोक्त नमूद तक्त्यातील निविदाधारकांपैकी विमा दर तसेच विमा सरंक्षण याकरिता योग्य वाटत असलेल्या निविदा धारक कंपनीची निवड करुन “ऐच्छिक स्वरुपात” विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा ( Personal Accident Insurance ) व विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance ) योजना विद्यार्थ्यांसाठी लागू करावी.

३. अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) अनुषंगाने **सदरहू Insurance ची Eligibility, Benefits आणि Important Terms & Conditions संदर्भातील महत्वाच्या मुद्यांची माहिती सोबत जोडलेल्या “प्रपत्र-अ” मध्ये नमूद करण्यात आली आहे. याबाबतची**

**विस्तृत माहिती संचालक, उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांचेकडून www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द आली आहे.**

४. प्रस्तूत विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance ) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance ) योजनेकरिता उपरोक्त नमूद तक्यातील कंपन्यांचे विमा संरक्षण दर हे ३ वर्षाकरिता स्थिर असतील. सदर योजना प्रभाविपणे अंमलात आणण्याकरिता तसेच या योजनां संदर्भात प्राप्त होणारे आक्षेप / तक्रारी / मार्गदर्शन याकरिता संचालक, उच्च शिक्षण संचालनालय , पुणे यांना समन्वय अधिकारी (Nodal Office) म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३१०१६१६५७३४५५०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.10.16 16:59:56 +05'30'

**( अजित बाविस्कर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
कुलगुरु / कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
विमा संचालक, विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन (म्हाडा), वान्द्रे (पूर्व), मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा परीक्षा)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर.
जिल्हा कोषाधिकारी, मुंबई / पुणे.
ICICI Lombard Insurance Company Ltd., Mumbai.
National insurance co. Ltd ., Mumbai
निवड नस्ती (विशि-५).

(शासन निर्णय क्रमांक :- क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५, दिनांक १६ ऑक्टोबर , २०२३ सोबतचे सहपत्र )

## -- प्रपत्र अ --

# 1. Insurance Eligibility

<table>
<tr><th colspan="3">PLAN A: MANDATORY COVERAGE (PERSONAL ACCIDENT INSURANCE)</th></tr>
<tr><td>Particulars</td><td colspan="2">Deliverables</td></tr>
<tr><td rowspan="3">Insured Details</td><td colspan="2">Primary Insured Member: The Student studying under the colleges, institutions, universities which are affiliated, associated, administered, categorized under The Higher & Technical Education, Government of Maharashtra</td></tr>
<tr><td colspan="2">Secondary Insured Member: One Parent or the Guardian as mentioned in the college enrolment / admission form</td></tr>
<tr><td colspan="2">The Unit Comprises of ONE (01) Primary Insured Member + ONE (01) Secondary Insured Member</td></tr>
<tr><td>Sum Insured Ratio</td><td>Primary Member (Student): 20%</td><td>Secondary Member (Guardian): 80%</td></tr>
<tr><td rowspan="2">Sum Insured Bifurcation (PER UNIT)</td><td colspan="2">Primary Member (Student): Rs. 1,00,000 (Rupees One Lac only)</td></tr>
<tr><td colspan="2">Secondary Member (Parent or Guardian): Rs. 4,00,000 (Rupees Four Lac only)</td></tr>
<tr><td>Relationship Type</td><td colspan="2">Non Employer-Employee</td></tr>
<tr><td>Policy Type</td><td colspan="2">The Policy shall be on the ‘Named’ basis for ONE (01) Student as well as ONE (01) Parent or Guardian mentioned in the enrollment form of the respective educational institution<br><br>The Insurance Company may ask the respective ‘Educational Institution’ to provide the data of the primary insured member and/or the secondary insured member during the enrolment and/or before the inception of the Insurance Policy. The Insurance company may also, at its discretion issue an ‘Unnamed’ policy based on the declaration provided by the respective educational institution</td></tr>
<tr><td>Enrollment Type</td><td colspan="2">Non-Selection. The educational institution to provide a declaration (online or offline) for the coverage of ‘All-students’. No selection shall be permissible by the respective educational institution. The coverage is mandatory for all student(s) and their respective ONE (01) parent/ guardian</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| Total Sum Insured PER UNIT (Primary Insured Member + Secondary Insured Member) | Rs. 5 Lac (Rupees Five Lac) |
| Mid-Term Addition Deletions | Permissible only to the students & their respective Parent/ Guardian by the means of 'New Admission'. Deletion by the means of opting out of the educational institution |
| Waiting Period | No Waiting Period. All Insured members are covered from Day One (01) in the policy |
| Group Administrator | The educational institution shall be the Master Policy Holder of the Policy |
| Geographical Boundary | The Policyshall be 24 x 7 World-wide cover |

| PLAN B: OPTIONAL COVERAGE (MEDICLAIM POLICY) | |
|---|---|
| Particulars | Deliverables |
| Insured Details | Primary Insured Member: The Student studying under the colleges, institutions, universities which are affiliated, associated, administered, categorized under The Higher & Technical Education, Government of Maharashtra |
| Sum Insured | The total sum insured per student is INR 2 Lacs (Rupees two lacs only) |
| Relationship Type | Non Employer-Employee |
| Policy Type | The Policy shall be on Named basis for ONE (01) student only. The Insurance company may ask the respective Educational Institution to provide the data of the primary insured member during the enrolment and / or before the inception of the insurance policy. |
| Enrollment Type | Non-Selection. The educational institution to provide a declaration for the coverage of 'All-students'. No selection shall be permissible by the respective educational institution. The coverage is mandatory for all student(s) and their respective ONE (01) parent/ guardian |
| Mid-Term Addition Deletions | Permissible only to the students by the means of 'New Admission'. Deletion by the means of opting out of the educational institution. |
| Waiting Period | No Waiting Period. All Insured members are covered from Day One (01) in the policy |
| Group Administrator | The educational institution shall be the Master Policy Holder of the Policy |
| Geographical Boundary | The coverage shall be restricted to the Geographical Limits within the boundaries of Republic of India (National Coverage) |

## 2. Benefits. (Accidental Coverage)

| PLAN -A: PERSONAL ACCIDENT INSURANCE | | | |
|---|---|---|---|
| Accidental Coverage | Benefits | | Compensation as % of the Capital Sum Insured |
| | Death Only/ Permanent Total Disability | | 100% |
| | Loss of One Limb or One Eye | | 50% |
| | Loss of Sight on Both Eyes | | 100% |
| | Loss of Both Hands and Or Loss of Both Feet | | 100% |
| | Loss of one hand and Loss of One foot | | 100% |
| | Loss of One Eye and One Hand | | 100% |
| | Child Education Grant | | 10% of Capital Sum Insured |
| Partial Disablement due to Accident | Loss Covered | | Percentage of Sum Insured |
| | 1. | Loss of Use/ Physical Separation: One entire hand | 50% |
| | | One entire foot | 50% |
| | | Loss of Sight of one eye | 50% |
| | | Loss of toes – all | 20% |
| | | Great both phalanges | 5% |
| | | Great – one phalanx | 2% |
| | | Other than great if more than one toe lost | 1% |
| | 2. | Loss of Use of both ears | 50% |
| | 3. | Loss of Use of one ear | 20% |
| | 4. | Loss of four fingers and thumb of one hand | 40% |
| | 5. | Loss of four fingers | 35% |
| | 6. | Loss of thumb | 25% |
| | | Loss of both phalanges - one phalanx | 10% |
| | 7. | Loss of Index finger - three phalanges | 10% |
| | | Loss of two phalanges | 8% |
| | | Loss of one phalanx | 4% |

| | | | |
|---|---|---|---|
| | 8. | Loss of middle finger – three phalanges<br>Loss of two phalanges<br>Loss of one phalanx | 6%<br>4%<br>2% |
| | 9. | Loss of ring finger - three phalanges two<br>phalanges<br>one phalanx | 5%<br>4%<br>2% |
| | 10. | Loss of little finger<br>three phalanges two phalanges<br>one phalanx | 4%<br>3%<br>2% |
| | 11. | Loss of metacarpus -first or second (additional)<br>third, fourth or fifth (additional) | 3%<br>2% |
| | 12. | Any other permanent partial disablement | Percentage as assessed by the independent Registered Medical Practitioner |
| Coverage Specifications | I. Accidental Death Benefit – The payment of Lumpsum amount to the nominee in the event of an accidental death of the beneficiary as described in the table above<br>II. Accidental Permanent Disability Benefit - The payment of Lumpsum amount to the nominee in the event of an accidental permanent disability of the beneficiary as described in the table above<br>III. Accidental Partial Disability Benefit- The payment of Lumpsum amount to the nominee in the event of an accidental partial disability of the beneficiary as described in the table above<br>IV. Child Education Welfare / Children Education Grant - In the event of death or permanent total disablement of the Insured Parent/ Guardian due to an Accident as defined, the Insurance Company shall pay 'Child Education Grant' for the Student enrolled in the policy an additional compensation of a lumpsum pay out of10% of the Capital Sum Insured once per event, per policy period | | |

| | |
|---|---|
| | V. Accidental Hospitalisation Benefit: A cashless hospitalisation benefit across the network of empanelled hospitals (Pan-India) in case of bodily injuries to the primary insured member or the secondary insured member the expenses towards the treatment during the hospitalization for up the maximum of INR 50,000/-(Primary Plus Secondary insured) floater amount Per policy period. In case of the hospitalization event at the non-network/ non-empanelled hospital, the insured can claim for the reimbursement of expenses from the Insurance Company towards the treatment undertaken at the hospitalisation due to accident. The policy shall cover only medicinal expenses including (not limited to); Room/ ICU Charges, Doctor's Fees, Cost of Investigation, Pharmacy Charges, Nursing Charges. All non-medical expenses, consumables shall not be payable under the policy |
| **PLAN B: OPTIONAL COVERAGE (MEDICLAIM POLICY)** | |
| Nature of Coverage | Pure Hospitalization Cover only. The proximate cause of hospitalization should be 'Emergency' in Nature. Any planned procedures, treatments, surgeries shall NOT be under the scope of cover under this policy |
| Coverage Specifications | I. Cover Type: Hospitalization Only<br>II. Admissibility: Cashless in Network Hospitals, Reimbursement in Non-Network Hospitals & Pre & Post Hospitalization Claims<br>III. In-patient Hospitalization for Covid_19: Covered<br>IV. Pre-Existing Conditions: Covered from Day One<br>V. Waiver of 30 days, 1st Year Exclusion, 2nd Year Exclusion & 4th Year Exclusion<br>VI. Class of Treatment: Private Room (subject to Clause VII)<br>VII. Room Rent Restriction: 2% of Sum Insured for Normal & 4% for ICU<br>VIII. Pre & Post Hospitalization: Medical Expenses arising 30 days Prior to Hospitalization & 60 days post hospitalization shall be payable<br>IX. Ambulance Charges of INR 2000/- Per Hospitalization event shall be payable<br>X. Dental Treatment: Payable only in case of an accident<br>XI. Vision: LASIX, LASER Procedure, Corrective Treatments shall be payable for up to Rs. 25,000/- per eye in case if the corrective |

| | | |
|---|---|---|
| | | procedure is necessitated for the Insured with reciprocal length / corrective index of + - 7 Diopter |
| | XII. | AYUSH Treatment: In-patient hospitalization for AYUSH Treatment shall be payable up to the base sum insured |
| | XIII. | Claim Intimation: Not exceeding 7 days post hospitalization |

## 3. Important Terms and Conditions

| | | |
|---|---|---|
| General Terms & Conditions | I. | The Terms & Conditions of the Tailor-made Personal Accident Insurance Policy under 'Student Accident Insurance Scheme' shall be governed by this Tender Document and 'To-Be-Issued' G.R, Tri-partite Agreement and/or the 'Work Order' issued to the shortlisted Insurance Company/ Insurance Companies. |
| | II. | The Insurance Company shall issue the Insurance Policy in total conformity with the terms & conditions of this Tender Document. The Terms & Conditions which are not expressly agreed to in this document will not be binding on the insured. |
| | III. | The claims shall be settled whether Approved, Repudiated or Shortfall within 21 days of the receipt of the Duly Completed Claim Form with the relevant documents. If there is any additional requirement in the insurance claim, the letter should be forwarded to the concerned claimant or the representative of the claimant along with the copy to the representative of the Integrated Risk Insurance Brokers Limited |
| | IV. | The Claim Intimation shall be provided to the Insurance Company favorably within 15 days of the occurrence of the incident/ accident & No Later than 120 days of the occurrence of the incident/ accident. The Insurance Company shall NOT be responsible for payment of claims to the beneficiary for any claims submitted after 120 days from the date of Occurrence of Accident/ Incident |
| | V. | After sanctioning the claim amount, the Insurance Company shall deposit the 'Compensation' in INR (Indian Rupees) within 15 days via NEFT/ RTGS/ IMPS or any other electronic mode of payment as permissible by the Banking Regulations. |
| | VI. | In case of the Non-availability of the nominee as the Parent/ Guardian (Secondary Insured Member) on the Admission / Enrollment form, the benefit of insurance shall be provided upon |

| | |
|---|---|
| | the receipt of the 'Legal Heir Certificate' from the respective tahsildar / taluka-office/ district court or as deemed appropriate& amended by the relevant authority.<br>VII. The extent of disability, whether Permanent Total, Partial, Temporary or any other shall be determined & validated by the Civil Surgeon of the Government which shall be final & binding upon the Insurance Company as well as the insured/ claimant. The entitlement of the compensation, benefit shall be in accordance with the certification by the Civil Surgeon of the Government.<br><br>Any violations to the Claim Settlement methodology, timelines, dispute shall be resolved by the Nodal Agency (Integrated Risk Insurance Brokers Limited). The Nodal Agency shall take up the 'unresolved disputes' with the IRDA and/or the Ombudsman as deemed appropriate and necessary. |
| Policy Exclusions | I. Suicide or Attempt of Suicide<br>II. Intentional Self Injury<br>III. Pregnancy or Childbirth<br>IV. Bleedings from the inner organs<br>V. Aviation, other than as a passenger<br>VI. Participation in Motor Rallies, Adventure Sports<br>VII. War, including civil war<br>VIII. Natural Death<br>IX. Terrorism, except attack by Naxalites<br>X. Any Accidental Event Under the influence of alcohol, drugs, psychotropic substances<br>XI. Accidents Arising out of event of misfeasance<br>XII. Nuclear Radiation or Nuclear Weapons Materials<br>XIII. Murder by immediate beneficiary. |

**अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेल्या वैयक्तीक अपघात विमा योजना तसेच विद्यार्थी वैद्यकीय योजनेस "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" हे नाव देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / वि शि ५**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - २८ नोव्हेंबर, २०२३

**संदर्भ :** - उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/ प्र.क्र.१४/विशि५, दिनांक १६ ऑक्टोंबर २०२३

**प्रस्तावना :**

**संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे राज्यातील** अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक स्वरुपाची विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance ) तसेच विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance ) योजना लागू करण्यात आली आहे. युवकांच्या वैचारिक शक्तीला जागृत करणारे स्वामी विवेकानंद यांचे कार्य हे सर्व युवकांना प्रेरणादायी असल्याने त्यांचा जन्मदिवस १२ जानेवारी रोजी दरवर्षी "राष्ट्रीय युवक दिन" म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर शासनाची सदरहू विमा योजना महाविद्यालयीन युवक / युवतींच्या स्वास्थाशी निगडीत असल्याने सदर योजनेस "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" असे नाव देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** -

**दिनांक १६/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील** अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी **लागू केलेल्या** विमा योजनेचे "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" असे नामकरण करण्यात येत आहे. सदरहू बाब सर्व अकृषी विद्यापीठे तसेच सदरहू अकृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणा-या महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३११२८१११९३११४०८ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=deb455609479b6c7f30e7f1f9a8360c0f8600a542859e8fe229d6ea333415e8d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=99EB928028DF71EBDFCD2898E209D499192AD3899261FEAD42F7D38A3141AB69, cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2023.11.28 14:50:03 +05'30'

**( अजित बाविस्कर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय , मुंबई .
मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई .
कुलगुरु / कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य
विमा संचालक, विमा संचालनालय, गृहनिर्माण भवन (म्हाडा), वान्द्रे (पूर्व), मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा)- महाराष्ट्र १ व २, मुंबई/ नागपूर,
जिल्हा कोषाधिकारी, मुंबई / पुणे,
ICICI Lombard Insurance Company Ltd., Mumbai.
National insurance co. Ltd ., Mumbai
निवड नस्ती (विशि-५).